**<u>वादी क्र. १ चा उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे वकील श्री. के.आर.पराडकर यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>**

०८. हे म्हणणे खरे आहे की रमाकांत तुकाराम गोसावी वादी क्र. २ हे भोगवे–मठ–चिंदर या गावचे रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकती या भोगवे –मठ– चिंदर या परिसरातील आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझे व वादी क्र. २ चे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतींची वस्तुस्थिती वादी क्र. २ यांच्या चांगल्या माहीतीची होती. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र. २ ने मला अखत्यारपत्र देतेवेळी वादगस्त पायवाटेबाबतचे वाद नव्हते. साक्षीदार पुन्हा सांगतो की वादी क्र. २ ने मला अखत्यारपत्र देतेवेळी वादग्रस्त पायवाटेबाबतचे वाद नव्हते. माझ्या व वादी क्र. २ याच्या घरामधील अंतर साधारणतः ४०० मीटर आहे. वादी क्र. २ हे मुंबई येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र. २ जेव्हा गावी येतात तेव्हा त्यांची माझ्याशी प्रत्येकवेळी भेट होतेच असे नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वी वादी क्र. २ ने मला दिलेल्या अखत्यारपत्राचा वापर करण्याचा योग आला नाही. वादी क्र. २ याच्या गावातील घरात कोणीही राहत नाही, सर्व लोक मुंबई येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की वादग्रस्त पायवाटेवरुन जेव्हा वाद झाले त्यावेळी वादी क्र. २ हे मुंबई येथे होते. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी वादग्रस्त पायवाटेबाबत कायदेशीर सल्ला घेण्यासाठी मला एकट्यालाच वकिलांकडे जावे लागले. हे म्हणणे खरे आहे की दावा तयार झाल्यानंतर तो माझ्या म्हणण्याप्रमाणे बरोबर असल्याची खात्री करुनच मी तो दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की मी दाव्याचा मसुदा वादी क्र. २ याला वाचून दाखविला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी वादग्रस्त पायवाटेबाबतचे वाद वादी क्र.२ यांना सांगितले नाही.

०९. हे म्हणणे खरे आहे की मी या न्यायालयात यापुर्वी नि.दि.मु.क्र.४६/२००५ हा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या निकालाविरुध्द मी जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग ओरोस येथे नि.दि.अ.क्र.७३/२०१३ दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की मी सर्व न्यायालयीन कामे व्यक्तीशः हजर राहून पाहिली असल्याने मला कोर्ट कामकाजाची माहिती आहे. मी साक्ष देण्यापुर्वी या दाव्यातील वादी व प्रतिवादींनी दाखल केलेली सर्व कागदपत्रे पाहिलेली आहेत.

१०. हे म्हणणे खरे आहे की मी कायमस्वरुपी भोगवे मठ चिंदरवाडी येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र. २ यांनी मला याच पत्त्यावर त्यांचे मी घेतलेले अखत्यारपत्र रद्द केले बाबतची नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की सदरची नोटीस मी न स्वीकारल्यामुळे ती परत गेली होती. (साक्षीदाराला नि. ४२ येथील वादी क्र. २ यांनी दाखल केलेला अर्ज दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की वादी क्र. २ यांनी त्यांनी मला दिलेल्या अखत्यारपत्राचा गैरवापर करुन मी प्रतिवादी क्र. १ ते १३ विरुध्द खोटा दावा दाखल केलेला असल्याने आपणास या दाव्यातून कमी करावे अशी विनंती निशाणी ४२ येथील अर्जाद्वारे वादी क्र. २ यांनी न्यायालयास केली होती. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ४२ येथील अर्जामध्ये वादी क्र. २ यांनी वादी क्र. १ यांना दिलेले अखत्यारपत्र रद्द केले असल्याबाबतचा मजकूर आहे. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ४२ येथील अर्जाद्वारे वादी क्र. २ याने माझ्यावर गंभीर आरोप केले होते. (साक्षीदाराला नि. ५५/१ कडील दि. २९/०१/२०२३ रोजीची 'दैनिक प्रहार' सिंधुदुर्ग आवृत्तीची मूळप्रत दाखविण्यात आली.) सदर आवृत्तीद्वारे वादी क्र. २ यांनी मला दिलेले अखत्यारपत्र रद्द केले बाबतची जाहीर नोटीस दिली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. वादी क्र. २ ला त्यांनी निशाणी ४२ येथील अर्जाद्वारे माझ्यावर केलेल्या गंभीर आरोपांबाबत लेखी नोटीस देवून त्याबाबत खुलासा मागावा असे मला आजपर्यंत वाटले नाही. हे म्हणणे खरे नाही की जाहीर नोटीस 'दैनिक प्रहार' सिंधुदुर्ग आवृत्ती मध्ये प्रसिध्द झालेली असताना व त्याची माहिती मला असताना देखील तो कागद माझ्या विरोधात जाणारा असल्याने मला त्याची माहिती नाही असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या सरतपासामध्ये जो मजकूर नमूद केला आहे तो अत्यंत लबाडीचा असून न्यायालयाची फसवणूक करण्याच्या उद्देशाने केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की मला वादी क्र. २ यांचा अखत्यारी म्हणून प्रस्तुत दाव्याचे कामकाज चालविण्याचा अगर जबाब देण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत क्रमांक ५ म्हणजेच सर्वे नं. १०० हि.नं.१ कडे माझी मालकी व कब्जेवहिवाट नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मला सदर मिळकतीबाबत वादी क्र. १ म्हणून प्रतिवादी क्र. १ ते १३ विरुध्द दाद मागण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत क्र.१ ते ४ या माझ्या कुळपणाच्या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत क्र. १ ते ४ मध्ये पायवाट करुन त्या क्षेत्राचा कब्जा प्रतिवादींनी अनाधिकारे मिळविला व तो परत मिळावा यासाठी मी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग ओरोस यांच्याकडे

आजपर्यंत अर्ज केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे दावा मिळकत क्रमांक १ ते ४ चा कब्जा या न्यायालयाकडे परत मागण्याचा मला अधिकार नाही.

(**प्रतिवादी क्र. १ ते १३ तर्फे वकील श्री. के.आर.पराडकर यांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**)

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/–
(के.के.पाटील)
दिनांक– १२/०१/२०२४ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.